# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी – दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४ Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik- 422 004

**Tel:** (0253) 2539190 / 6659190, **Student Helpline:** (0253) 2539111/6659111

**Web.:** http://www.muhs.ac.in **E-mail :** academic1@muhs.ac.in

MUHS

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र), पीएच.डी.,डी.एससी.
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine) Ph. D, D.Sc.
**Registrar**


(२)

मआविवि/शै.वि./ईओ/पदवी व पदव्युत्तर/३२८९/२०२१ दि.२९/११/२०२१

**परिपत्रक क्र.८३/२०२१**

**विषय : कोविड १९ या आजाराचा प्रादुर्भाव सुरु असल्याने विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या नविन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता Freshers Party किंवा इतर पार्टीचे सामूहीक आयोजन करण्यावर कडक निर्बंध घेण्याबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्यामध्ये कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याने या आजाराच्या प्रतिबंधात्मक उपायांसाठी महाविद्यालयस्तरावर लसीकरण करुन घेण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र.२७/२०२१ अन्वये, सर्व संलग्नित महाविद्यालयांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने, महाविद्यालयस्तरावर शिक्षकांचे / शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे लसीकरण करुन घेण्याची प्रक्रिया चालु आहे.

कोविड १९ या आजाराचा अजुनही देशस्तरावर व राज्यस्तराव प्रादुर्भाव सुरु असल्याचे दिसुन येत आहे. देशस्तरावर वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षाकरीता नविन तुकडी प्रवेशित झाल्याने स्वागताहार्य पार्टीचे (Freshers Party) आयोजन केल्यामुळे कोविड १९ चा संसर्गाचा प्रादुर्भाव झाला. त्यामध्ये असे निदर्शनास आले की, ज्या विद्यार्थ्यांचे दोन्ही लसींचे डोस घेऊन झालेले आहे, त्यांना देखिल कोविड १९ या आजाराचा संसर्ग पुन:श्च झाला आहे.

तरी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे अध्यक्ष / अधिष्ठाता / प्राचार्य यांना कळविण्यात येत आहे की, राज्यामध्ये कोविड १९ या आजाराचा प्रादुर्भाव सद्यस्थितीत देखिल सुरु असल्यामुळे महाविद्यालय स्तरावर कोणत्याही प्रकारच्या स्वागताहार्य पार्टी किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या पार्टीचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. तसेच, लसीकरणानंतरही सर्वांनी कोविड-१९ यासंदर्भातील केंद्रशासन व राज्यशासन यांनी वेळोवळी निर्गमीत केलेल्या आदेशांचे तंतोतंत पालन करण्याबाबतच्या सूचना करण्यात याव्यात व दक्षता घेण्यात यावी.

**कुलसचिव**

**प्रति,**
**मा. संस्थाचालक/अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,**
**(पदवी व पदव्युत्तर पदवी)**

प्रति,
श्री. प्रवीण ... , website, Notice Board वर प्रकाशित करावे तसेच सर्व Academic Incharge ना सुचना द्याव्यात.
02/12/2021